दुरुस्ती प्रत

कि.क्रि.अर्ज नं. ५४/२०२६

कागल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो,

यांचे न्यायालयात....

संदीप अण्णाप्पा ठिकणे

व.व.४३, धंदा : व्यवसाय,

रा.चिंचवाड, ता.करवीर, जि.कोल्हापूर अर्जदार

Order
Keep alongwith Exh. 1

J.M.F.C.
08/07/2026

विरुद्ध

१. महाराष्ट्र सरकार तर्फे

राज्य उत्पादन शुल्क विभाग, कोल्हापूर

व कागल पोलीस ठाणे

PRANITA SUHAS PATIL Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2026.07.08 17:29:55 +0530

२. मयुरी रोडलाईन्स तर्फे

अशोक पायगोंडा पाटील

व.व.५६, धंदा : व्यवसाय,

रा. चिंचवाड, ता.करवीर, जि.कोल्हापूर. वि.प

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३/४९७ प्रमाणे मुद्देमाल मिळविणेसाठी अर्ज.

निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कागल

गु.र.नं. ०८/२०२६

गुन्हा-

महाराष्ट्र मध्य निषेध अधिनियम १९४९ कलम ६५ (अ) (ब) (ड) (इ),८१,८३,९० व १०८ भारतीय न्याय संहिता कलम १२३,३४१,३४२,३४५ (१) व ट्रेड मार्क्स कायदा १९९९ चे कलम १०३ व १०४ प्रमाणे

<u>यातील अर्जदार तर्फे विनंती अर्ज की,</u>

१. <u>मुद्देमालाचा तपशील-</u>

| अ. क्र. | तपशील | किंमत |
|---|---|---|
| अ) | VIVO Y 400 8/256 5G<br>OLIVE GREEN<br>IMEI NUMBER- | 23,999/- |
| | TOTALE AMOUNT | 23,999/- |

वर नमूद मुद्देमाल हा यातील अर्जदार यांचे मालकीचा असून प्रस्तुत अर्जाचे कारणास्तव सदर मुद्देमालास यापुढे **"मुद्देमाल क्र. १ अ)"** असे संबोधनेत येत आहे.

२. यातील अर्जदार हे वर नमूद पत्त्यावर कायमपणे राहणेस आहेत.

३. यातील अर्जदार क्र १ व वि. प. क्र. २ यांचे दरम्यान मामा व भाचे असे नाते संबंध आहे. यातील वि. प. क्र. २ यांनी त्यांचे भाच्यास म्हणजेच अर्जदार याला मोबाईल फोन (मुद्देमाल क्र. १ अ) भेट स्वरुपात दिला होता. त्यामुळे सदराचा फोन (मुद्देमाल क्र. १ अ) चे बिल केवळ वि. प. क्र. २ यांचे नावे आहे. मात्र, त्याची पुर्ण मालकी व ताबा यातील अर्जदार यांचेकडे असून त्याचा पुर्ण वापर हेच करत होते.

४. यातील अर्जदार क्र १ हे विवो वाय ४०० ८/२५६ ५ जी ओलिव्ह ग्रीन या मोबाईल चे कायदेशीर मालक असून, प्रस्तुत कामी अर्जदार क्र १ यांच्या मालकीचा मुद्देमाल हा राज्य उत्पादन शुल्क विभाग,

कोल्हापूर व कागल पोलीस ठाणे यांनी गुन्हा रजिस्टर नं. ०८/२०२६ चे गुन्ह्याचे कामी जप्त केलेला असुन, तो सदर मोबाईल हा राज्य उत्पादन शुल्क विभाग कोल्हापूर यांचेकडे जप्त अवस्थेत आहे. सदर जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांच्याच मालकीचा असून अर्जदार हे सदर मोबाईल त्यांचे दैनंदिन वापरातील आहे.

५. वर वर्णन केलेला जप्त मुद्देमाल क्र. १ अ) हा अर्जदार यांच्या मालकीचा असून वि. प. क्र २ यांचे नावे असल्याने त्यांना या कामी वि. प. क्र. २ म्हणून सामील केलेले आहे.

६. <u>सदर पोलीस ठाणेमध्ये जप्त अवस्थेत असलेल्या मुद्देमालाचा तपशील खालीलप्रमाणे –</u>

| अ.क्र. | तपशिल | किंमत |
|---|---|---|
| १. | **VIVO Y 400 8/256 5G OLIVE GREEN** | **23,999/-** |
| | **TOTALE AMOUNT** | **23,999/-** |

७. वर वर्णन केलेला जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांच्या मालकीचा असून अर्जदार यांचे दैनंदिन वापरातील आहे. सदर जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांना यांचेकडे परत मिळावा, यासाठी कारणे खालीलप्रमाणे –

अ) सदरचा जप्त मुद्देमाल पोलीसांकडे राहिल्यास सदर मुद्देमालाचे खराब होण्याची दाट शक्यता आहे.

आ) सदर जप्त मुद्देमाल यातील अर्जदार यांना त्यांचे व्यवसायातील दैनंदिन, आर्थिक वापरासाठी आवश्यक असल्याने, अर्जदार यांचा व्यवसाय हा याच मुद्देमालावर निर्भर असलेमुळे अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे सदर मोबाईल परत मिळणे आवश्यक व गरजेचे आहे. तसेच सदर मोबाईल संबंधीत पोलीसांकडे असल्याने अर्जदार नं २ यांचे दैनंदिन आर्थिक नुकसान होत आहे.

इ) तसेच अर्जदार १ यांचे मालकीचा विवो कंपनीचा वर नमूद तपशिलाचा फोन हा यातील अर्जदार हे त्यांचे व्यवसाय व दैनंदिन जीवनात वापरत असलेने, व त्यामध्ये त्यांचे सर्व व्यावसायिक फोन नंबर तथा माहिती असलेने अर्जदार यांचे कधीही भरून न येणारे असे अपरिमित नुकसान होत आहे.

ई) सदर जप्त मुद्देमाल अर्जदार यांना बॉण्डवर ताबेत दिल्यास त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल अथवा फेरफार करणार नाही किंवा त्याची विक्री अगर तब्दील करणार नाही.

उ) सदर जप्त मुद्देमाल अर्जदार यांना बॉण्डवर ताबेत दिल्यास मे. कोर्ट आदेश करील त्यावेळी अर्जदार हे मे. कोर्टात हजर करण्यास तयार आहेत.

ऊ) सदर जप्त मुद्देमाल बॉण्डवर ताबेत दिल्यास अर्जदार हे मे.कोर्टाच्या अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहेत.

ऋ) सदर जप्त मुद्देमालाच्या मालकी हक्काच्या कागदोपत्री अर्जदार यांच्या नावाची नोंद आहे.

ऌ) सदर जप्त मुद्देमालाच्या मालकीविषयी त्यांचे बिलाची प्रत सादर केली आहे.

ऍ) सदर जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये राहिल्यास मुद्देमाल खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

८. <u>सबब अर्जदार यांची विनंती की,</u>

अ) अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा.

आ)सदरचा जप्त वर अर्जातील नमूद मुद्देमाल हा अर्जदार यांना मे. कोर्टाने बॉण्डवर ताबेत देण्याचा हुकूम द्यावा.

इ) जरुर तर अर्ज दुरुस्तीस परवानगी मिळावी.

कागल

ता. ०८/ ०७ / २०२६ अर्जदार

## प्रतिज्ञा

आम्ही यातील अर्जदार सत्य प्रतिज्ञेवर असे नमूद करतो की, वरनमूद अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे पूर्णपणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मु.कोल्हापूर.

ता. ०८/ ०७/ २०२६

अर्जदार

## ॲफिडेव्हीट

मी यातील अर्जदार या लेखाने देवाच्या शपथेवर असे नमूद करतो की, वरनमूद अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे पूर्णपणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु.//कागल /कोल्हापूर.

ता. ०८/ ०७/ २०२६

अर्जदार

## प्रतिज्ञा

मी उपरोक्त ॲफिडेव्हीट करणार सत्य प्रतिज्ञेवर असे नमूद करतो की, वरनमूद अर्जातील व त्याखालील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे पूर्णपणे खरा व बरोबर आहे.म्हणून केली प्रतिज्ञा आज मु.कोल्हापूर.

ता. ०८/ ०७/ २०२६

अर्जदार